ARTHA Poona 4

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख २७ जून, १९५६ | अंक २६

## विविध माहिती

**मळ्यावरील मजुरांसाठी घरें**—छोट्या मळ्यांवर काम करणाऱ्या मजुरांची राहण्याची सोय करण्यासाठी भारतीय सरकारनें योजना तयार केली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ती पूर्ण करण्याचा सरकारचा विचार आहे. सध्यां ती राज्य सरकारांकडे विचार करण्यासाठी पाठविण्यांत आली आहे. भारतीय सरकार ह्या कामासाठी राज्य सरकारांना कर्जें देणार आहे.

**भतकल बंदराजवळ दीपगृह**—भतकल बंदराजवळ नवीन दीपगृह बांधण्यांत आलें आहे. त्यासाठी ४ लाख रुपये खर्च आला. दीपगृहावरील विजेचा दिवा अतिशय तेजस्वी असून तो १७ मैलांच्या टापूंत दिसूं शकतो. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत २५ दीपगृहें बांधण्यांत आलीं. त्यांपैकीं हें एक आहे. दीपगृहाच्या मनोऱ्याची उंची १८४ फूट आहे.

**इचलकरंजीचा पाणीपुरवठा**—इचलकरंजी नगरपालिकेनें गांवाला पाणीपुरवठा करण्यासाठी १० लाख रुपये खर्च येणारी योजना तयार केली असून मुंबई सरकारनें ती मंजूर केली आहे. सरकार ३,००,००० रुपयांची मदत देणार आहे. दोन लाख रुपये नगरपालिकेनें आपल्या उत्पन्नांतून खर्च करण्याच व ५,००,००० रुपयांचें कर्ज काढण्याचें ठरविलें आहे.

**स्पर्धा जाणवूं लागली**—गेल्या कांहीं वर्षांपासून कम्युनिस्ट राष्ट्रांनीं निर्यात व्यापारांत पश्चिम युरोपांतील राष्ट्रांशीं स्पर्धा करण्यास सुरुवात केली आहे. ही स्पर्धा ब्रिटनला जाणवूं लागल्याचें दिसतें. ब्रिटनचे चॅन्सेलर ऑफ दि एक्स्चेकर मि. मॅकमिलन ह्यांनीं, निर्यात व्यापारांत ब्रिटनला कम्युनिस्ट राष्ट्रांकडून होणाऱ्या स्पर्धेकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे असे उद्‌गार काढले आहेत.

**त्रिवेंद्रम् येथें खेळांचा आखाडा**—त्रिवेंद्रम् शहरांत आधुनिक पद्धतीचा खेळांचा आखाडा बांधण्यांत येणार आहे. ह्या कामांत राज्यांतील पोलिसदल श्रमदान करणार आहे. खेळांच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांना उपयोगी पडेल अशा रीतीनें तो बांधण्यांत येईल, व त्यासाठी १ लाख रुपये खर्च येईल.

**भारत फ्रेंच विमानें घेणार**—भारतीय सरकारनें फ्रान्सकडून जेटवर चालणारीं ११० लढाऊ विमानें विकत घेण्याचें ठरविलें आहे, असें समजतें. ह्यासंबंधीचा कराराहि उभयतां राष्ट्रांत करण्यांत आला आहे. त्याशिवाय वैमानिकांना शिक्षण देण्यासाठी लागणारीं अशाच प्रकारचीं आणखीं १५ विमानें घेण्याचेंहि घाटत आहे, फ्रान्सकडून विमानें घेण्याची ही पहिलीच वेळ आहे.

**हिंगोली–खांडवा रेल्वे रस्ता**—हिंगोली ते खांडवा हा रेल्वे रस्ता बांधण्यासंबंधींचीं कामें करण्यासाठी १,२४,००,००० रुपयांचीं कंत्राटें देण्यांत आलीं आहेत. हा रस्ता १८७ मैल लांबीचा होईल आणि त्यामुळें दक्षिण भारतामधील अरुंद रेल्वे आणि उत्तर भारतामधील अरुंद रेल्वे जोडल्या जातील. ह्या कामावर सध्या १५,००० मजुरांना रोजगार मिळाला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुरू झालेलें रेल्वेचें हें सर्वांत मोठें काम आहे.

**रेल्वेच्या गाड्या जुळविण्याचीं केंद्रें**—भिलई व रूरकेला ह्या ठिकाणीं काढण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्यांना लागणारा कच्चा माल तेथें पोंचवावा लागेल. त्याच्या वहातुकीची व्यवस्था करण्यासाठी दोन्हीं ठिकाणीं रेल्वेच्या गाड्या जुळविण्याचीं केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत. दोन्हीं केंद्रांत रोज १५ गाड्या जोडण्याची व्यवस्था होईल.

**तांदुळाचें उत्पादन वाढविण्याचा विचार**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत मध्यप्रदेशांतील तांदुळाचें उत्पादन ४० टक्क्यांनीं वाढविण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामीं भातशेतीच्या जपानी पद्धतीचा उपयोग करण्याचा व अधिक खत वापरण्याचा विचार चालू आहे. राज्यांतील तांदुळाचें सध्यांचें उत्पादन २५० लाख टन आहे.

**विजेच्या दरांत कपात**—१ जुलैपासून वीज–पुरवठ्याच्या दरांत कपात करण्याचें सुरत इलेक्ट्रिसिटी कंपनीनें ठरविलें आहे. घरगुती उपयोगासाठी करण्यांत येणाऱ्या पुरवठ्याच्या दरांत १० ते २० टक्के कपात करण्यांत येणार असून औद्योगिक उपयोगासाठी वापरल्या जाणाऱ्या विजेचे दर ७ ते ८·५ टक्क्यांनीं कमी करण्यांत येणार आहेत. अनुकूल परिस्थितीप्रमाणें दर कमी करण्याचें कंपनीचें धोरण आहे.

**ताडी मोऱ्यांतून ओतून दिली**—बुद्धजयंतीच्या निमित्तानें कोलंबो शहरांतील दारूचे गुत्ते २३ मे ते २९ मेपर्यंत बंद करण्यांत आले होते. ह्या आठवड्यांत सुमारें ६०,००० गॅलन ताडी मोऱ्यांतून ओतून देण्यांत आली. त्या ताडीची किंमत १,७५,००० रुपये आली असती.

**जबलपूर शहराची सुधारणा**—जबलपूरच्या कॉर्पोरेशननें शहराची सुधारणा करण्याची योजना आखली आहे. मुख्य रस्त्यावर दुतर्फा झाडें लावणें, ठिकठिकाणीं छोटचा बागा व हिरवळी तयार करणें, मुलांच्यासाठी क्रीडांगणें बांधणें, इत्यादि कामें योजनेंत समाविष्ट करण्यांत आली आहेत. हीं कामें पूर्ण झाल्यावर शहराची शोभा अधिक वाढेल.

### पहिल्या पंचवार्षिक योजनेची फलनिष्पत्ति

१९५१–५६ या पांच वर्षांत राष्ट्रीय उत्पन्न सुमारें १८ टक्क्यांनीं वाढलें.

अन्नोत्पादनांत सुमारें २० टक्के वाढ झाली.

कापूस व प्रमुख गळित धान्यें यांचें उत्पादन अनुक्रमें ४५ व ८ टक्क्यांनीं वाढलें.

पाटबंधाऱ्याच्या मोठ्या योजनांद्वारां ६० लाख एकरांवर जमिनीस पाणीपुरवठा झाला.

छोट्या पाटबंधाऱ्यांच्या योजनांमुळें आणखी एक कोटी एकर जमीन भिजूं लागली.

औद्योगिक उत्पादनांत क्रमशः वाढ झाली आहे. १९५० व १९५१ मधील औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक अनुक्रमें १०५ व ११७ होता तो १९५५ मध्यें १६१ वर गेला आहे. (१९४६ मधील निर्देशांक = १०० धरून.

वीजउत्पादनांत १९५०–५१ मधील ६५७५ दशलक्ष किलोवॅट तासांवरून १९५५–५६ मध्यें ११,००० दशलक्ष किलोवॅट तासांपर्यंत वाढ झाली आहे.

सीमेंटचें उत्पादन १९५०–५१ मधील २·७ दशलक्ष टनांवरून १९५५–५६ मध्यें ४·३ दशलक्ष टनांवर गेलें आहे.

सरकारी क्षेत्रांतील अनेक औद्योगिक योजना पूर्ण झाल्या आणि विशेषतः खासगी विभागांतील उत्पादन माल व भांडवली माल यांत बराच पैसा गुंतविण्यांत आला.

तीन पोलाद कारखाने व अवजड विद्युत कारखाना स्थापन करण्याचीं प्रारंभिक कामें पुरीं होऊन दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील मोठमोठ्या कार्यक्रमांचा पाया घालण्यांत आला.

---

### प्रा. द. गो. कर्वे जागतिक प्रवास करून परतले

प्रा. द. गो. कर्वे हे जपान, अमेरिका, ग्रेटब्रिटन, प्रभृति सुमारें १५ देशांचा दौरा करून गेल्या आठवड्यांत परत आले. फोर्ड फौंडेशन व प्लॅनिंग कमिशन ह्यांनीं त्यांच्या प्रवासाची योजना केली होती. सहकारी संस्था, लहान प्रमाणावरील उत्पादन, सरकारी कारभार, इत्यादि प्रश्नांचा अभ्यास प्रा. कर्वे ह्यांना करावयास मिळावा, असा त्यांच्या दौऱ्याचा हेतु होता.

---

### CO-OPERATIVE TRAINING COLLEGE, POONA

**Higher Diploma in Co-operation Examination**

*(April 1956)*

Successful Candidates in Order of Merit

**First Class** 12, 42, 26, 15, 30, 53, 16, 38, 48, 21, 14, 39, 3, 43, 55, 24, 41, 23.

**Second Class** 17, 32, 34, 13, 10, 33, 1, 27, 35, 22, 6, 29, 28, 36, 9, 18, 4, 19, 31, 45.

**Pass Class** 37, 46, 8, 54, 5, 49, 40, 50.

**Pass with exemption** 7, 20, 25, 2, 56.

**Prize winners** 12 & 20

---

**पाकिस्तानला तांदुळाचा पुरवठा**—पाकिस्तानवर ओढवलेल्या पुराच्या व टोळधाडीच्या आपत्तीमुळें त्या देशांत अन्नधान्याचा तुटवडा भासत आहे. आपत्तींतून मार्ग काढण्यास मदत व्हावी म्हणून रशिआनें पाकिस्तानला २०,००० टन तांदूळ आणि २०,००० टन गहू देण्याचें कबूल केलें आहे. त्याप्रमाणें कांहीं धान्य घेऊन एक रशिअन बोट निघालीहि आहे.










# अर्थ

बुधवार, ता. २७ जून, १९५६





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## भारताला मिळणारी अमेरिकेची मदत

अमेरिकेचे भारतामधील वकील श्री. जॉन शेरमन कूपर ह्यांनीं अमेरिकेकडून भारताला मिळावयाच्या मदतीसंबंधीं आपले विचार प्रगट केले आहेत. अमेरिकेच्या सिनेटच्या परराष्ट्र-संबंध-विषयक कमिटीपुढें ह्या विषयासंबंधीं साक्ष देतांना ते म्हणाले कीं भारत हा देश मोठी प्रगति करीत आहे. अशा वेळीं अमेरिकेनें ह्या देशाला करावयाची मदत सतत चालू ठेवून उभयतांमधील स्नेहभाव वृद्धिंगत केला पाहिजे. भारताला ८ कोटी डॉलर्सची मदत देण्यांत यावी, असें मला वाटतें. त्यांपैकी १ कोटी डॉलर्स तांत्रिक साह्यासाठी देण्यांत यावेत आणि उरलेली रक्कम विकास-कार्यासाठी देण्यांत यावी. अमेरिकेंत शिल्लक असलेल्या शेतीच्या मालाची भारताला गरज आहे काय ? असा प्रश्न त्यांना कमिटीनें विचारला असतां त्यांनीं असें उत्तर दिलें कीं असा माल विकत घेण्यासंबंधीं भारतीय सरकार अमेरिकेशीं वाटाघाटी करण्यास तयार होईल. गहूं आणि कापूस घेण्याचा भारतीय सरकार विचार करील. त्याशिवाय दूधदुभत्याचे पदार्थ व इतर कांहीं मालहि भारत घेईल. सध्या भारत अन्नधान्याच्या दृष्टीनें स्वयंपूर्ण आहे, ही गोष्ट खरी; पण पिकें न आल्यास जो प्रसंग उद्‌भवेल त्याला तोंड देण्यासाठी भारतीय सरकार धान्याचा साठा करून ठेवण्याच्या विचारांत आहे. शेतीच्या मालाचीहि संभाव्य मदत नेहमींच्या मदतीशिवाय वेगळी असावी. भारतांत दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची आतां सुरवात होत आहे. अशा वेळीं अन्नधान्याच्या पुरवठ्याची निश्चिती असणें ही फार महत्त्वाची बाब आहे. अन्नधान्याच्या पुरवठ्यामुळें चलनवृद्धीविरुद्ध संरक्षण तर मिळेलच; पण कांहीं कारणांमुळें अन्नधान्याच्या निर्मितींत घट आल्यास उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीलाहि यशस्वीपणें तोंड देतां येईल.

---

## वर्गीकृत जमातींवरील कर्जाचा बोजा

आंध्र राज्यांतील वर्गीकृत जमातींतील लोकांवर असलेला कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी कायदा करण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. ह्या मागासलेल्या जमातीचें कल्याण करण्यासाठी राज्याचे गव्हर्नर श्री. त्रिवेदी हे स्वतः जातीनें लक्ष घालीत आहेत. जमाती मुख्यतः विशाखापट्टम् आणि गोदावरी जिल्ह्यांत राहणाऱ्या आहेत. त्यांच्या डोक्यावर कर्जाचा किती बोजा आहे हें समजण्यासाठी प्रथम तपासणी करून अहवाल तयार करण्यांत आला पाहिजे. हें काम करण्यासाठी सरकारनें चार जणांचें एक कमिशन नेमलें आहे. सर्व प्रश्नासंबंधीं माहिती गोळा करून उपाय सुचविण्याचें काम कमिशनवर सोंपविण्यांत आलें आहे. संबंधित जमातींना अधिक आर्थिक साह्य देतां यावें म्हणून रिझर्व्ह बँकेसारख्या संस्थांचा कितपत उपयोग करतां येईल. ह्यासंबंधींहि विचार चालू आहे. सध्यां जमातींना साह्य देण्याचें काम शेड्यूल्ड ट्राइब्स फिनॅन्स अँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ही संस्था करीत आहे. गव्हर्नरांच्या सल्ल्याप्रमाणें ह्या संस्थेचें रूपांतर एखाद्या सहकारी संस्थेंत करण्याचें घाटत आहे. विशाखापट्टम् आणि गोदावरी जिल्ह्यांतील बाजारपेठांतून दरसाल ५० लाख रुपयांचे व्यवहार होत असावेत, असा अंदाज आहे. पण, ह्या व्यवहारांतील बहुतेक मलिदा सावकारच खातात असें आढळून आलें आहे. सावकारांच्या जाळ्यांमधून जमातींतील लोकांची सुटका करणें, हा संकल्पित कायद्याचा प्रधान हेतु आहे, असें सरकारच्या एका अधिकाऱ्यानें सांगितलें आहे. मागासलेल्या जमातींमधील लोकांवर कर्जाचा भरमसाठ बोजा राहिल्यास त्यांची भरभराट घडवून आणणें कठीण होईल हें उघडच आहे. त्यांना मिळणारी आर्थिक मदत सहकारी पद्धतीनें देण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे.

---

## रेल्वेच्या सामानाची परदेशांतून आयात

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत भारतीय रेल्वेवर वाहतुकीचा पडणारा ताण बराच वाढणार आहे. हा ताण सहन करण्यासाठी जरूर तें साहित्य परदेशाहून आयात करण्यांत येणार आहे. परदेशांतील बऱ्याच देशांकडे मागण्या नोंदविण्यांत आल्या असून त्यांत पूर्व युरोपांतील कांहीं राष्ट्रेंहि आहेत. रशियाकडूनहि कांहीं सामग्री मागविण्यांत आली आहे. रशिआकडून रेल्वेची सामग्री मागविण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. भारतानें रशिआकडून रुंद रुळावर चालणारीं १५ वाफेचीं एंजिनें घ्यावयाचें ठरविलें आहे. एंजिनांची किंमत सुमारें ६५,००० पौंड होईल. युगोस्लाव्हिआंतील एका कारखान्याकडून अरुंद रुळावर चालणारीं १२ वाफेचीं एंजिनें आयात करण्यांत येणार आहेत. त्यांची किंमत १,३१,००० पौंड होईल. पोलंडमधील एका रेल्वे एंजिनाच्या कारखान्याकडून वाफेवर चालणारीं ३० एंजिनें विकत घेण्यांत येतील. ही पण रुंद रुळावर धावणारीं असतील व त्यांची किंमत ९,०८,००० पौंड असेल. ऑस्ट्रियांतील एका कंपनीकडूनहि ३० वाफेवर चालणारीं एंजिनें घेण्यांत येणार आहेत. त्यांची किंमत ९,२१,००० पाउंड भरेल. तथापि, भारतानें पूर्व जर्मनीकडे नोंदलेली साहित्याची मागणी अधिक अर्थपूर्ण आहे. भारतामधील विकास योजनांना अनेक प्रकारच्या अवजड यंत्रांची गरज असते. पण हीं यंत्रें त्या त्या ठिकाणीं पोंचविणें बरेंच अडचणीचें असतें. अशा प्रकारची अवजड यंत्रसामुग्री वाहून नेण्यासाठी कांहीं खास पद्धतीचे रेल्वेचे मालवाहू डबे लागतात. ह्या कामासाठीं उपयोगी पडतील असे १७ रेल्वेचे डबे पूर्व जर्मनीकडून मागविण्यांत आले आहेत. त्यांची किंमत ७१,००० पाउंडपर्यंत असेल.

---

**सीलोन–बल्गेरिआ व्यापारी करार**—सीलोन आणि बल्गेरिआ ह्या देशांच्या दरम्यान व्यापाराचा व पैशाच्या देवघेवी संबंधीचा करार करण्यांत आला आहे. बल्गेरिआ सीलोनला यंत्रसामुग्री, कांच, साखर, रसायनें, इत्यादि माल पुरविणार असून त्यांच्या बदला सीलोनकडून जरूर तो माल घेणार आहे.

# BANK OF [illegible] LIMITED.

*Balance Sheet as at 31st December, 1953.*

## CAPITAL AND LIABILITIES

| | | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| **1. Capital** | | | |
| **Authorised Capital** 50,000 Shares of Rs. 100/- each ... | | 50,00,000—0—0 | |
| **Issued Capital** 25,000 Shares of Rs. 100/- each ... | | 25,00,000—0—0 | |
| **Subscribed Capital** 25,000 Shares of Rs. 100/- each ... | | 25,00,000—0—0 | |
| **Amount Called up** at Rs. 50/- per share ... | | 12,50,000—0—0 | |
| Less calls unpaid ... | | nil | |
| Add Forfeited Shares ... | | nil | 12,50,000—0—0 |
| **2. Reserve Fund and Other Reserves** ... | | | 34,500—0—0 |
| **3. Deposits and Other Accounts :** | | | |
| Fixed Deposits ... | | 3,71,356—4—0 | |
| Savings Bank Deposits ... | | 5,91,396—10—9 | |
| Current Accounts, and Contingency Accounts, etc. ... | | 5,38,320—2—1 | 15,01,073—0–10 |
| **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | | |
| (1) In India ... | | 32,023—6—8 | |
| (2) Outside India ... | | nil | 32,023—6—8 |
| **Particulars** | | | |
| (1) Secured ... | 32,023-6-8 | | |
| (2) Unsecured ... | nil | | |
| **5. Bills Payable** ... | | | 1,289-10—9 |
| **6. Bills For Collection, being Bills Receivable as per contra** | | | |
| (1) Payable in India ... | | 89,283—1—5 | |
| (2) Payable outside India ... | | nil | 89,283—1—5 |
| **7. Other Liabilities** | | | |
| (1) Provision for Income tax ... | | 1,806—3—0 | |
| (2) Branch Adjustment ... | | 1,815-14—9 | |
| (3) Oustandig Liabilities for Expenses ... | | 703—7—6 | |
| (4) Income received in advance ... | | 230—0—0 | 4,555—9—3 |
| **8. Acceptances, Endorsements and other obligations as per contra** | | | nil |
| **9. Profit and Loss Account** | | | |
| Profit as per last Balance Sheet. ... | | 3,133-10—6 | |
| Less appropriations :— | | | |
| To Reserve Fund | Rs. 500—0—0 | | |
| To Provision for doubtful debts ... | Rs. 2,000—0—0 | 2,500—0—0 | |
| | | 633-10—6 | |
| **Less:—** | | | |
| Transferred to Loss for the year as per contra ... | | 633-10—6 | |
| **10. Contingent Liabilities** | | | |
| Nil | | | |
| Total Rs. ... | | | 29,12,724-12-11 |

# BANK OF POONA LIMITED.

***Balance Sheet as at 31st December, 1955.***

## PROPERTY AND ASSETS

| Particulars | | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| **1. Cash** | | | |
| In hand and with Reserve Bank and State Bank (Including Foreign Currency Notes) ... | | | 2,72,962—1—0 |
| **2. Balances with other Banks (On Current Account)** | | | |
| (1) In India ... | | 1,04,483—0—4 | |
| (2) Outside India ... | | nil | 1,04,483—0—4 |
| **3. Money at Call and Short Notice** | | | Nil |
| **4. Investments: (At Book Value)** | | | |
| (1) Securities of the Central and State Governments and other Trustee Securities including Treasury Bills of the Central and State Governments of the face value of Rs. 6,01,300/- (Market value Rs. 5,56,626-13-0) ... | | 5,99,202—4—0 | |
| (2) Shares: Ordinary fully paid (Market Value Rs. 4,669-12-6) ... | | 6,069—8—6 | |
| Partly paid ... | | nil | |
| Deferred fully paid ... | | nil | |
| (3) Debentures or Bonds. ... | | nil | |
| (4) Other Investments. ... | | nil | |
| (5) Gold ... | | nil | 6,05,271-12—6 |
| (Govt. Securities of the face value of Rs. 6,00,000/- are lodged with other Banks for advance facilities). | | | |
| **5. Advances** | | | |
| (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors subject to particulars under clause (4) below) | | | |
| (1) **Loans, Cash Credits, Overdrafts, etc.** | | | |
| (1) In India | | 17,13,475—6—7 | |
| (2) Outside India | | nil | |
| | | 17,13,475—6—7 | |
| (2) **Bills Discounted and Purchased.** (excluding Treasury Bills of the Central and State Governments). | | | |
| (1) Payable in India | 4,112—8—0 | | |
| (2) Payable outside India | nil | 4,112—8—0 | 17,17,587-14—7 |
| **Particulars of Advances** (*See Page 206*) | | | |
| **6. Bills Receivable, being Bills For Collection as per contra** | | | |
| (1) Payable in India ... | | 89,283—1—5 | |
| (2) Payable outside India ... | | nil | 89,283—1—5 |
| **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and other Obligations as per contra** ... | | | nil |
| **8. Premises Less Depreciations** ... | | | nil |
| **9. Furniture and Fixtures Less Depreciation** | | | |
| At cost as per last Balance Sheet. ... | | 50,607—0—9 | |
| Additions during the year. ... | | 100—0—0 | |
| | | 50,707—0—9 | |
| Less Depreciation upto 31-12-54. | 16,188-0-9 | | |
| For the year | 2,073-0-0 | 18,261—0—9 | 32,446—0—0 |
| **10. Other Assets including silver** | | | |
| 1. Land at cost ... | | 19,000—0—0 | |
| 2. Vehicle | 637-0-0 | | |
| Less Depreciation for the year 31-12-55 | 128-0-0 | 509—0—0 | |
| 3. Stationery Stock ... | | 2,004—0—0 | |
| 4. Stamps ... | | 245—1—6 | |
| 5. Interest accrued on Investments ... | | 5,675—5—0 | |
| 6. Tax deducted at source ... | | 8,419-14—0 | |
| 7. Prepaid Expenses ... | | 425-12—0 | |
| 8. Income due but not received ... | | 163—0—0 | 36,442—0—6 |
| **11. Non-Banking Assets Acquired in satisfaction of Claims** ... | | | 37,988—0—0 |
| **12. Profit and Loss Account** | | | |
| Loss during the year as per Profit and Loss Account ... | | 16,894—9—1 | |
| Less Balance of Profit of Last year ... | | 633-10—6 | 16,260-14—7 |
| Total Rs.... | | | 29,12,724-12-11 |

# BANK OF POONA LIMITED.

**Particulars of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet as at 31-12-1955 on page 205**

| | Particulars of advances :— | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| (1) | Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured | 10,64,121—9—4 |
| (2) | Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 3,53,813—7-11 |
| (3) | Debts considered good, secured by personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | nil |
| (4) | Debts considered doubtful or bad, not provided for ... | 2,99,652-13—4 |
| | | 17,17,587-14—7 |
| (5) | Debts due by Directors or Officers of the Banking Company, or any of them either severally or jointly with any other persons ... | 41,072—6—0 |
| (6) | Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of the private companies, as Members ... | 6,099—0—0 |
| (7) | Maximum total amount of advances, including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 1,50,161—4—0 |
| (8) | Maximum total amount of advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents or in the case of the private companies, as Members ... | 2,25,470—5—3 |
| (9) | Due from Banking Companies ... | nil |

***Profit and Loss Account for the Year ended 31st December, 1955***

| EXPENDITURE | Rs. As.Ps. | INCOME | Rs. As.Ps. |
|---|---|---|---|
| To Interest paid on Deposits, Borrowings, etc. ... | 32,979—2-10 | (Less Provision made during the year for Bad and Doubtful Debts and for other usual or necessary Provisions) | |
| „ Salaries and Allowances and Provident Fund : (1) Manager 6,920-0-0; (2) Staff 36,101-5-0 | 43,021—5—0 | By Interest and Discount ... | 81,979—6—5 |
| | | „ Commission, Exchange &Brokerage | 4,571-15—9 |
| | | „ Rents ... | nil |
| „ Directors' & Local Committee members' fees & allowances ... | nil | „ Net Profit on sale of Investments, Gold & Silver, Land, Premises and other Assets (not credited to Reserves or any particular Fund or Account) ... | nil |
| „ Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | 7,918—5—3 | | |
| „ Law Charges ... | 8,569—3—0 | | |
| „ Postage, Telegrams, and Stamps | 3,171—1—2 | „ Net Profit on Revaluation of Investments, Gold & Silver, Land, Premises and other Assets (not credited to Reserves or to any particular Fund or Account) ... | nil |
| „ Auditor's Fees ... | 1,000—0—0 | | |
| „ Depreciation on and Repairs to the Banking Company's Property | 2,562—1—9 | | |
| „ Stationery, Printing, Advertisement, etc. | 3,294—9—3 | „ Income from Non-Banking Assets and Profit from Sale of or dealing with such Assets ... | 560—0—0 |
| „ Loss from Sale of or dealing with Non-Banking Assets ... | nil | | |
| „ Other expenditure : ... | 4,455—5—0 | „ Other receipts : ... | 2,965—2—0 |
| | | „ Net Loss for the Year ... | 16,894—9—1 |
| Total Rs. ... | 1,06,971—1—3 | Total Rs. ... | 1,06,971—1—3 |

As per our certificate at the foot of the annexed Balance Sheet.

D. R. Naik, *Chairman.*

P. G. Bhagwat, *Chartered Accountants.*

N. B. Parulekar, F. P. Pocha, G. K. Naik — *Directors.*

K. D. Joglekar, *Accountant.*

G. G. Sathe, *Manager.*

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

We have audited the above Balance Sheet of Bank of Poona Limited, as at 31st December, 1955, and also the foregoing Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the audited returns from Branches and report that :—

(a) We have obtained all the information and explanations we have required and have found them to be satisfactory, (b) The transactions of the Bank which have come to our notice have been within the powers of the Bank, (c) The returns received from the Branch Offices of the Bank have been found adequate for the purpose of the audit, (d) In our opinion the above Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the Law, (e) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of affairs of the Bank according to the best of our information and explanations given to us and as shown by the books of the Bank and (f) In our opinion, books of account have been kept by the Bank as required by the Section 130, of the Indian Companies Act 1913.

P. G. Bhagwat
*Chartered Accountants.*

Poona, 24th March, 1956.

## भारताचा आयात व निर्यात व्यापार

भारताचा निर्यात व्यापार १९५४ शीं तुलना करतां १९५५ मध्यें ४१ कोटी रु. नीं अधिक झाला. या देशांतून १९५५ मध्यें एकूण ६०४ कोटी रु. किंमतीचा माल निर्यात झाला. १९५४ मध्यें ६१६ कोटी रु. किंमतीचा माल आयात झाला होता. १९५५ मध्यें हा आंकडा वाढून ६४४ कोटी रु. वर गेला. अशा रीतीन एकूण व्यापार १९५४ मधील १,१७९ कोटी रु. वरून वाढून १.२४८ कोटी रु. वर गेला. आयातीच्या बाबतींत स्वातंत्र्य देतांना घेतलेली दक्षता आणि हळुहळु शिथिल केलेलें निर्यात नियंत्रण व निर्यात वाढीसाठी केलेले संघटित प्रयत्न यामुळें चांगलें यश लाभलें.

पुनर्विलोकनाच्या वर्षांत भांडवली माल व यंत्रसामुग्री यांची आयात त्यामागील वर्षापेक्षा २३ कोटी रु. नीं अधिक झाली. देशांत डिझेल इंजिनें, मोटारी, सायकली व देशांत तयार होणाऱ्या इतर अशाच वस्तू यांची आयात कमी प्रमाणांत झाली. तथापि ज्यांचें उत्पादन अद्यापहि देशांत होत नाहीं अशा वस्तूंच्या आयातीचें मान बरेंच वाढलें होतें.

सदर वर्षांत कच्चा कापूस, ताग, धातू, कृत्रिम रेशीम, रेशमाचें सूत, कच्ची लोकर, रसायनें, खतें, इत्यादि आवश्यक त्या कच्च्या मालाची व अर्धपक्क्या मालाची आयात करण्याची तरतूद करण्यांत आलेली होती. रेल्वेसाठी मागविलेली यंत्रसामुग्री विशेषतः डबे व वाफिणी आणि इतर वाहतुकीची सामुग्री यांची आयात अधिक झाली; तर खनिज तेलें, वृत्तपत्र कागद, सूत, यासारख्या औद्योगिक मालाच्या आयातीचें मान कमी होतें.

देशांतील अन्नधान्याची परिस्थिति सुधारल्यानें १९५५ मध्यें अन्नधान्याची आयात १४ कोटी रु. नीं घटली. अंतर्गत जादा उत्पादनामुळें साखरेच्या आयातीचें मानहि २२ कोटी रु. नीं कमी झालें. तथापि औषधें, दुग्धपदार्थ, उपकरणें, वगैरे ग्राहकोपयोगी वस्तूंची आयात जास्त झाली.

### निर्यातींत वाढ

अनेक वस्तूंवरील जकात कमी वा रद्द करूनहि व कांहींच्या किंमती घटूनहि निर्यातीचें प्रमाण १९५५ मध्यें चांगलेंच वाढल्याचें दिसून आलें. शेंगदाणे, शेंगदाण्याचें तेल, अळशीचें तेल व कच्चा कापूस यांच्या निर्यातींत चांगलीच वाढ झाली. तागी मालाची निर्यात त्यामागील वर्षापेक्षा ४.७७ कोटी रु. नीं जास्तच झाली; तर रग, सुती कापड व अशाच प्रकारचा इतर तयार माल यांचा निर्यात व्यापार २२ कोटी रु. नीं अधिक झाला.

सदर वर्षांत इंग्लंड, अमेरिका, प. जर्मनी, जपान, फ्रान्स, सिलोन, कानडा, ऑस्ट्रेलिया, पाकिस्तान वगैरे देशांकडून होणाऱ्या आयातीचें मान बरेंच वाढलें, तर इजिप्त, बेहरिन, वगैरे देशांहून होणाऱ्या आयातीचें मान घटलें. १९५५ मध्यें इंग्लंड आणि अमेरिका या दोन देशांकडे एकूण निर्यातीपैकी ४३ टक्के माल पाठविण्यांत आला. तसेंच चीन, रशिया आणि पोलंड व युगोस्लाव्हिया वगैरे पूर्व युरोपीय देशांशीं होणाऱ्या एकूण व्यापारांत वाढ झाली.

सन १९५५ मध्यें डॉलर विभागांतून ९९ कोटी रु. किंमतीचा माल आयात झाला. तर त्या विभागाकडे ११५ कोटी रु. किंमतीचा माल निर्यात झाला. एकूण आयात व निर्यात यांच्या मानानें पाहतां तें प्रमाण अनुक्रमानें १५ व १९ टक्के आहे. सुलभ चलनाच्या विभागांतून ५४५ कोटी रु. किंमतीचा माल आयात झाला तर त्या विभागाकडे एकूण निर्यातीपैकी ८० टक्के माल निर्यात झाला.

परवान्यासाठी केलेले अर्ज त्वरित निकालांत काढण्याकडे आयात व निर्यात व्यापार नियंत्रण संघटनेनें विशेष लक्ष पुरवून बहुतेक प्रकरणीं अर्ज पोचल्यानंतर थोड्याच दिवसांत परवाने दिले. १९५४ व ५५ मध्यें निर्यात परवान्यांसाठी आलेले बहुतेक अर्ज निकालांत काढण्यांत आले. १९५५ च्या अखेरीस आयात परवान्याच्या अर्जांपैकी अवघे ५०५ अर्ज अनिर्णित राहिले होते. आयात परवान्याकरतां जुलै–डिसेंबर १९५५ या मुदतींत एकूण १,३३,८९० अर्ज आलेले होते.

---

**बागलकोट सिमेंट कंपनीला वर्क्स मॅनेजर पाहिजे**— बागलकोट सिमेंट कंपनीच्या ३०० टनांच्या बागलकोट येथील कारखान्याला १८०० रु. – १०० रु. – ३,००० रु. ह्या वेतनश्रेणींत वर्क्स-मॅनेजर हवा आहे.

**नवीन करमणूक केंद्र**—हैद्राबाद व सिकंद्राबाद ह्या दोन शहरांना जोडणारा हुसेनसागर नांवाचा एक विस्तीर्ण तलाव आहे. ह्या तलावाच्या आसमंतांत एक करमणुकीचें केंद्र उभारण्यांत येणार आहे. तलावाच्या कांठीं मोठी बाग तयार करण्यांत येणार असून एका खुल्या नाट्यगृहाचीहि उभारणी होईल. ह्या कामासाठी एका कमिटीची नेमणूक सिकंद्राबाद कॉर्पोरेशननें केली आहे.

**एकमेकांना माहिती देण्यासाठी**—रशिआ व अमेरिका ह्या राष्ट्रांनीं एक करार करून आपापल्या नागरिकांना माहिती पुरविण्यासाठी दोन मासिक प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. 'रशिआ' हें इंग्लिश मासिक अमेरिकेंत प्रसिद्ध करण्यांत येईल व 'अमेरिका' हें मासिक रशिआंत प्रसिद्ध करण्यांत येईल. दोन्हीं मासिकें ६४ पृष्ठांचीं असतील. पण त्यांत राजकारणविषयक मजकूर मात्र येणार नाहीं.


**व्याज आकारणीचें पुस्तक**
**( विस्तृत जंत्रीसह ) मिळेल.**
लेखक :–कृ. गो. घाटपांडे, वडगांव (मावळ), जिल्हा पुणें.
पन्नास दरांची एक कोटी कच्च्यापर्यंत व्याजआकारणी.
भरपूर कायदेशीर माहिती. मूल्य दोन रुपये.
पांच किंवा अधिक प्रतींना टपालखर्च माफ.



**तमाम दंतरोगांवर**
**☆ नागछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆**

## राज्य सरकारांचा योजनाखर्च

( कोटी रुपये )

| राज्य | पहिली योजना | दुसरी योजना |
|---|---|---|
| आंध्र | ७५·९ | ११९·० |
| आसाम | २८·१ | ५७·९ |
| बिहार | १०४·५ | १९४·२ |
| मुंबई | १८१·३ | २६६·२ |
| मध्यप्रदेश | ५७·५ | १२३·७ |
| मद्रास | ९७·० | १६३·१ |
| ओरिसा | ८५·२ | १००·० |
| पंजाब | १२४·० | १२६·३ |
| उत्तरप्रदेश | १६५·९ | २५३·१ |
| पश्चिम बंगाल | १५१·९ | १५३·७ |
| 'अ' राज्यें एकूण | १०७१·२ | १५६७·२ |
| हैदराबाद | ५७·० | १००·२ |
| मध्यभारत | २६·१ | ६७·३ |
| म्हैसूर | ५१·२ | ८०·६ |
| पेप्सू | ३९·२ | ३६·३ |
| राजस्थान | ६२·८ | ९७·४ |
| सौराष्ट्र | २९·८ | ४७·७ |
| त्रावणकोर-कोचीन | ३५·४ | ७२·० |
| जम्मू व काश्मीर | १३·२ | ३३·० |
| 'ब' राज्यें एकूण | ३२६·७ | ५३५·४ |
| अजमीर | ३·६ | ७·९ |
| भोपाळ | ९·३ | १४·३ |
| कूर्ग | २·० | ३·८ |
| दिल्ली | १०·५ | १७·० |
| हिमाचल प्रदेश | ७·५ | १४·७ |
| कच्छ | ४·८ | ७·९ |
| मणिपूर | २·२ | ६·२ |
| त्रिपुरा | ३·० | ८·५ |
| विंध्य प्रदेश | ९·३ | २४·९ |
| 'क' राज्यें एकूण | ५२·२ | १०५·२ |
| अंदमान व निकोबार बेटें | १·५ | ५·९ |
| नेफा | ४·४ | ९·५ |
| पॉण्डिचरी | ०·८ | ४·८ |
| एकूण | ६·७ | २०·२ |

**टाटा कारखान्याचा विस्तार**—पोलादाचे नळ तयार करण्याच्या जमशेटपूर येथील टाटा कंपनीच्या कारखान्यांचा विस्तार करण्याची योजना भारतीय सरकारनें मंजूर केली आहे. एका ब्रिटिश कंपनीच्या सहकार्यानें काढण्यांत आलेला हा कारखाना मार्च महिन्यांत चालू झाला. कारखान्यामधून दरसाल ९०,००० टन पोलादाचे नळ तयार होऊं शकतील.


### 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

स्थापना १९३६
## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा
[ शेड्यूल्ड बँक ]
हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*
शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी
ता. ३१-३-५६ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ९,१८,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,१२,८०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु | १,१०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | २-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

स्थापना सन १९३५ टे. न. २४५१८
## दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

☆ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ☆
श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांबे, ( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. ल. काळे, श्री. गे. ल. नलवडे,
श्री. म. बा. बेंडे, श्री. ज्ञा. मा. मनसूख.
डायरेक्टर्स.
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.